संपुर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे एकमेव मराठी वृत्तपत्र

# जागृत शोध

JAGRUT SHODHA

RNI.Reg.No.MAHMAR/2009/37305

संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा प्रतिनिधी व तालुक्यात तालुका प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क - ८००७०७२८२८

वर्ष १७ वे अंक २० वा सोमवार दि १० ते १६ जुलै २०२३ संपादक भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर मो ८००७०७२८२८ उपसंपादक राजेश जगताप

## पावसाळ्यातील आरोग्यविषयक तयारीचा आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्याकडून आढावा

पुणे (प्रतिनिधी ) - पावसाळ्यात उद्भवणारे आजार व पूर परिस्थितीत तातडीने आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागाने जिल्हा पातळी व गाव पातळीपर्यंत केलेल्या आरोग्यसेवा तयारीचा आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी आढावा घेतला.

दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित या बैठकीस आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर आदी उपस्थित होते.

आरोग्यमंत्री डॉ.सावंत म्हणाले, जोखीमग्रस्त गावे ओळखून तिथे शीघ्र प्रतिसाद पथके सज्ज ठेवावीत. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे व उद्रेक झाल्यास त्वरित उपाययोजना करण्यात यावी. पूर्वतयारीसाठी जिल्हा स्तरावरील अहवाल रोजच्या रोज तयार करण्यात यावा व त्यावर बारकाईने लक्ष ठेवण्यात यावे. पिण्याच्या पाण्याचे स्तोत्र तपासून पाहावेत आणि पाणी पिण्यास योग्य आहे किंवा नाही याची खात्री करावी.

जिल्ह्यातील समनव्यक अधिकाऱ्यांच्या दूरध्वनी क्रमांकाची यादी तयार करून ती प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अद्ययावत ठेवावी व राज्यस्तरावरही पाठवावी. साथरोग नियंत्रणासाठीच्या किट वाटप करण्यात याव्यात व त्याचा अहवाल तयार ठेवावा. आशाताई व आरोग्य कर्मचारी यांच्या याद्यासुद्धा जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे ठेवण्यात याव्यात.

डास उत्पत्ती ठिकाणे यावरही लक्ष द्यावे व पाणीसाठे चांगले राहतील यावरही लोकसहभागाद्वारे नियंत्रण ठेवावे. शीघ्रकृती पथकाद्वारे करावयाचे कामे तसेच इतर सूचनांसाठी एक पुस्तिका तयार करण्यात यावी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शक सूचना देण्यात याव्यात. पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवण्यात यावा. ग्रामपंचायत, नगरपंचायत येथे साथ रोगाबाबतची माहिती देण्यासाठी फलक लावण्यात यावेत, अशा सूचना यावेळी त्यांनी केल्या.

अतिरिक्त मुख्य सचिव श्री.म्हैसकर यांनी साथ रोगाबाबतची माहिती लोकांपर्यंत जाण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या. कठीण परिस्थितीत आरोग्य विभाग चांगली जबाबदारी पार पाडत असून पावसाळ्यातील आरोग्य परिस्थितीही व्यवस्थितपणे हाताळण्यास सर्वांनी सक्रिय रहावे, त्यांनी सांगितले.

बैठकीस आरोग्य विभागातील विभागीय आरोग्य उपसंचालक, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आरोग्य विभागामार्फत पावसाळ्यातील डेंगू,मलेरिया, जापानी मेंदूजवर, लेप्टोस्पायरोसिस या आजारांना प्रतिबंधासाठी जोखीमग्रस्त गावांची यादी तयार करण्यात आली आहे. गृहभेटी व आरोग्य कर्मचाऱ्या मार्फत सर्वेक्षण व रुग्णशोध मोहीम हाती घेण्यात आली आहे. आश्रम शाळा यांना वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या मार्फत नियमित भेटी देण्यात येत आहेत. पाणी गुणवत्ता नियंत्रण ७६ हजार पाणी नमुने तपासण्यात आले आहेत. पाण्याच्या स्रोतांचे सर्वेक्षण करून प्रत्येक गावांना हिरवे, पिवळे, लाल कार्ड देण्यात आले आहेत.



परिसर स्वच्छता, डासांपासून वैयक्तिक संरक्षणसाठी मच्छरदाणी, डास प्रतिबंधक क्रीम, खिडक्यांना जाळ्या बसविण्याबाबत समुपदेशन करण्यात आले आहे. प्रयोगशाळा सिद्धता, पुरेसा औषध साठा,शीघ्र प्रतिसाद पथके यांची स्थापना आणि गाव पातळीवर साथ रोग सर्वेक्षण तसेच अंतर विभागीय समन्वय व आरोग्य शिक्षण यावरही भर देण्यात येत आहे, अशी माहितीही बैठकीत देण्यात आली.

## एक रुपयात पीक विमा लाभ देणारे महाराष्ट्र एकमेव राज्य - महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

शिर्डी (प्रतिनिधी) - एक रुपयात पीक विमा योजना ही राज्य शासनाने सुरु केलेली महत्त्वाकांक्षी योजना शेतकऱ्यांना दिलासा देणारी आहे. शेतकऱ्यांना अशा योजनेतून लाभ देणारे महाराष्ट्र राज्य हे देशात एकमेव राज्य आहे. असे प्रतिपादन महसूल, पशुसंवर्धन व दूग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे केले.

राज्य शासनाने खरीप व रब्बी हंगामाकरीता सुरु केलेल्या एक रुपयात पीक विमा योजनेचा प्रसार करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रथाचे उद्घाटन महसूलमंत्री श्री.विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या रथांना हिरवा झेंडा दाखवून संपूर्ण जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांना या योजनेची माहिती देण्यासाठी हे रथ जिल्ह्यामध्ये रवाना करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी आधिकारी सुधाकर बोराळे, उपविभागीय कृषी आधिकारी विलास गायकवाड, मच्छिंद्र थेटे, दिपक पठारे, सतिष कानवडे, अशोकराव धावणे यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी, शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

याप्रसंगी बोलताना महसूलमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले की, यापूर्वी पीक विमा योजनेचा त्रास शेतकऱ्यांना सहन करावा लागला. शेतकऱ्यांची आर्थिक लुट आणि फसवणूक झाली. या परिस्थितीमध्ये बदल करण्यासाठी राज्य सरकारने शेतकऱ्यांना करिता एक रुपयात पीक विमा योजना सुरु केली. त्याची अंमलबजावणी आता यंदाच्या खरीप हंगामापासून सुरु होत असल्याचे त्यांनी सांगितले. या योजनेचा कोणताही आर्थिक भार शेतक-यांवर पडणार नाही. शासनच आता विम्याची रक्कम भरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



या योजनेत सहभाग घेण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वत:हून आता पुढे आले पाहिजे. हवामानातील बदल हे कृषी क्षेत्रापुढे मोठे आव्हान असल्याने आपल्या पीक उत्पादनाची सुरक्षितता वाढविण्यासाठी विमा योजनेचे संरक्षण कवच महत्वपूर्ण ठरणार आहे. शेतकऱ्यांनी कृषी कार्यालयांमध्ये संपर्क साधून या योजनेची माहिती घ्यावी. असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्यातील कृषी अधिकाऱ्यांनी गावपातळीवर जावून या योजनेचा प्रसार आणि प्रचार करुन, योजनेची माहिती शेतकऱ्यांना देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

जिल्हा अधीक्षक कृषी आधिकारी सुधाकर बोराळे यांनी या पीक विमा योजनेत सहभाग घेण्यासाठी ३१ जूलै २०२३ ही अंतीम तारीख असून, शेतकऱ्यांनी आपले अर्ज दाखल करण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रामध्ये सुविधा उपलब्ध करण्यात आली असून, उपविभागीय कृषी आधिकारी, तालुका कृषी आधिकारी कार्यालयातही संपर्क साधून योजनेत सहभाग घेण्याचे आवाहन केले.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घेतले साईबाबा समाधीचे दर्शन

शिर्डी (प्रतिनिधी) - महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज श्री साईबाबा समाधी मंदिराचे दर्शन घेतले. यावेळी राष्ट्रपतींनी द्वारकामाई व गुरूस्थानचे दर्शन घेतल्यानंतर श्री साईबाबा वस्तुसंग्रहालयास भेट दिली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे मंदिरात आगमन झाल्यावर महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, महसूल, पशुसंवर्धन, दूग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार सदाशिवराव लोखंडे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी नाशिक विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक बी.जी. शेखर पाटील, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा श्री.साईबाबा संस्थानच्या तदर्थ समितीचे अध्यक्ष सुधाकर यार्लगड्डा,



श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.सिवाशंकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे श्री साईबाबा मंदिरात आगमन झाल्यावर प्रथम त्यांनी ‘द्वारकामाई’ चे दर्शन घेतले. त्यानंतर श्री साईबाबा समाधी मंदिराचे दर्शन घेत पाद्यपूजा व आरती केली. समाधी मंदिर दर्शनानंतर गुरूस्थान मंदीर येथील निंबवृक्षास प्रदक्षिणा मारली. श्री साईबाबांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या वस्तू ठेवण्यात आलेल्या श्री साईबाबा वस्तुसंग्रहालयात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भेट दिली. श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.सिवाशंकर यांनी त्यांना वस्तुसंग्रहालयातील वस्तू आणि प्रतिमांविषयी माहिती दिली.

अहमदनगर जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सन्मानचिन्ह देऊन राष्ट्रपतींचा सत्कार केला. श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी पी.सिवाशंकर यांनी राष्ट्रपतींचा श्री साईबाबा यांची मूर्ती भेट देत सन्मान केला.

श्री साईबाबा मंदीर दर्शन झाल्यानंतर श्री साईबाबा प्रसादालयात राष्ट्रपतींनी प्रसादाचा आस्वाद घेतला.

भाविकांच्या शुभेच्छांचा स्वीकार - श्री साईबाबा मंदीर दर्शन झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या सुरक्षा वाहनांचा ताफा प्रसादालयाकडे मार्गक्रमण करत असतांना गेट नंबर १ येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ताफ्यातील गाड्या थांबवत गाडीतून खाली उतरत काही पावले चालत जाऊन सर्वसामान्य भाविकांच्या शुभेच्छांचा स्वीकार केला. राष्ट्रपतींच्या या साधेपणाचे भाविकांना कौतूक वाटले.

## माजी सरपंचानी दिली जीवे मारण्याची धमकी ; जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दलित महासंघाच्या वतीने निवेदन

नगर (प्रतिनिधी)- दलित महासंघाचे युवक अध्यक्ष सुरेंद्र सिंग घारु रा. महेशनगर,ता. जि.अहमदनगर यांना काही एक कारण नसतांना शहापूरचे माजी सरपंच दत्तात्रय दिलीप भालसिंग याने त्यांचे शरीराचे तुकडे तुकडे करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे.ते शहापुर येथे पेट्रोल भरण्यासाठी जात असतांना तेथील पुलाजवळ त्याने त्यांना आडवले तुझ्या शरीराचे तुकडे तुकडे करीन अशी त्याने धमकी दिली. तसेच वरिल इसमांपासुन त्यांचे जिवीतास धोका निर्माण झालेला आहे.तेंव्हा त्याच्यावर कडक कारवाई करावी. याबाबतचे निवेदन दलित महासंघाच्या वतीने अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांना देण्यात आले.याप्रसंगी दलित महासंघाच्या जिल्हाध्यक्षा सौ. अरुणाताई कांबळे,भिंगार टायगर ग्रुप चे सनीभाई भिंगारदिवे, दलित महासंघाचे युवक अध्यक्ष सुरेंद्र सिंग घारु आदी उपस्थित होते. शहापूर ग्रामपंचायतचे माजी सरपंच दत्तात्रय भालसिंग यांच्यावर पुर्वी ब-याच गुन्हयाची नोंद असुन वरिल इसम हा आडदांड व नंगाट स्वरुपाचा असुन बोलल्याप्रमाणे भिणार नाही तसेच तो असे म्हणतो की, माझे मोठया प्रमाणात राजकीय क्षेत्रात ओळख असुन पोलीस खाते सुध्दा काहीही करू शकत नाही याप्रमाणे अशी भाषा वापरुन अश्लील पध्दतीने शिवीगाळ करतो.तसेच त्याचे ग्रामपंचायत सदस्याने अविश्वास ठराव आणुन त्याचे पद काढले आहे. परंतु तो मला म्हणत आहे तु माझे पद काढले आहे. त्याच्या पदाचा व माझा कसल्याही प्रकारे संबंध नाही.या घटनेमुळे माझे जिवीतास मोठया प्रमाणात धोका निर्माण झालेला असुन माझ्या जीवाचे काही बरे वाईट झाल्यास माजी सरपंच दत्तात्रय भालसिंग हे सर्वस्वी जबाबदार राहतील. माझे जिवीतास झालेला धोका टाळावा व मला संरक्षण मिळावे. तसेच यापुर्वी सुध्दा वरिल इसमाबाबत दि. २४/११/२०२१, २६/११/२०२१ रोजी अर्ज सादर केलेला आहे परंतु अद्याप पावेतो वरिल इसमांवर कोणत्याही प्रकारे कायदेशीर कारवाई झालेली नाही. तरी हे.साहेबांना विनंती आहे की आपण दत्तात्रय भालसिंग त्यांच्यावर कठोर कारवाई करून शासन करावे.

## अखिल भारतीय राजभाषा परिषद यशस्वी करण्यासाठी नियोजन करावे-विभागीय आयुक्त सौरभ राव

पुणे (प्रतिनिधी)- हिंदी राजभाषा दिवस-२०२३ आणि अखिल भारतीय राजभाषा परिषदेचे आयोजन करण्याचा बहुमान जिल्हा प्रशासनाला मिळाला आहे. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाद्वारे योग्य नियोजन करुन परिषद यशस्वी करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी आज दिले.

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या भारतीय राजभाषा विभागाच्यावतीने १४ आणि १५ सप्टेंबर २०२३ रोजी बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रिडा संकुल येथे आयोजित करण्यात येत असलेल्या संयुक्त परिषदेच्या आयोजनासंदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस भारत सरकारच्या राजभाषा विभागाच्या सचिव अंशुली आर्या, संयुक्त सचिव मीनाक्षी जौली, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, क्रिडा आयुक्त सुहास दिवसे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, उपायुक्त श्रीमती वर्षा लड्डा-उंटवाल, अपर पोलीस आयुक्त अरविंद चावरीया,बी.जे.वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.मुरलीधर तांबे, आयआरसीटीसीचे महाप्रबंधक पिनाकिन मोरावाला यावेळी उपस्थित होते.

या सोहळ्यासाठी देशभरातून मान्यवर तसेच जवळपास सात हजारपेक्षा अधिक अधिकारी उपस्थित राहणार असल्याने, कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुरक्षा, वाहतूक व्यवस्था,आरोग्य सुविधा, विद्युत पुरवठा, पिण्याचे पाणी, महत्वाच्या व्यक्तींसाठी संपर्क अधिकाऱ्यांची नियुक्तीसंबधी कार्यवाही त्वरित करावी. इतर व्यवस्थेसंदर्भात सर्व संबधित यंत्रणांनी योग्य नियोजन करावे अशी सूचना श्री.राव यांनी यावेळी केली. बालेवाडी येथील क्रिडा संकुलात हस्तकला प्रदर्शन, वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने प्रशासनाने तयारी करावी असेही श्री.राव यांनी सांगितले.

राजभाषा विभागाच्या सचिव अंशुली आर्या यांनी अखिल भारतीय पातळीवरील या परिषदेचे आयोजन करण्याची संधी पुण्याला मिळाली असल्याचे सांगितले. परिषदेचे आयोजन यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी जिल्हा प्रशासनाला केले. बैठकीला विविध विभागांचे अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## जेसीबीचे साहित्य अल्पवयीन मुलांकडून जप्त

नगर(प्रतिनिधी)- जेसीबीचे साहित्य चोरी झालेल्या गुन्ह्याचा छडा कोतवाली पोलिसांनी लावला आहे. या चोरीतील दोन्ही आरोपी अल्पवयीन असून, त्यांच्याकडून चोरीला गेलेले साहित्य व मोपेड दुचाकी असा ६५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अरुण भानुदास ढाकणे (वय ४२ वर्ष, रा. जाधव पेट्रोलपंपाच्यामागे कल्याणरोड, अहमदनगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून जेसीबीचे साहित्य चोरी गेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

जाधव पेट्रालपंपाच्या मागील महानगरपालीकेच्या मोकळ्या जागेतून अरुण ढाकणे यांच्या मालकीच्या जेसीबीची (एमएच १६ ए एम ७००५) ३५ हजार किंमतीची एक लोखंडी बकेट चोरीला गेली होती. कोतवाली पोलीस ठाण्यात भादवि कलम ३७९ प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यातील दोन्ही आरोपी पंचपीर चावडी येथे येणार असल्याची माहिती कोतवालीचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे शोध पथकाने दोघांनाही सापळा लावून ताब्यात घेतले. दोन्ही आरोपींची कसून चौकशी केली असता त्यांनी जेसीबीचे साहित्य चोरी केल्याची कबुली दिली आहे. चोरीतील जेसीबीची बकेट व गुन्ह्यात वापरलेली एक्सेस मोपेड असा ६५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली मपोना संगीता बडे करीत आहेत.

## संपादकीय....

# सहकारी बँकांचा तिढा

समाजातील तळागाळापर्यंत पोहोचलेल्या सहकारी बँका आणि सर्व बँकांची शिखर बँक असलेली रिझर्व्ह बँक यांचे परस्परसंबंध खरे तर परस्परपूरक असायला हवेत. तसे असणे अपेक्षितही आहे. पण प्रत्यक्षात मात्र सहकारी बँकांना तसा अनुभव येत नाही. रिझर्व्ह बँकेकडून लादली जाणारी नियंत्रणे सहकारी बँकांना फक्त जाचकच नाही, तर व्यवसाय करण्यात अडचणी आणणारीही ठरतात. गतवर्षी ८ जून २०२२ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांची गृह कर्ज योजनेची मर्यादा दुपटीने म्हणजेच १.४० (एक कोटी ४० लाख) पर्यंत वाढवली. त्यामुळे नागरी सहकारी बँक क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले. परंतु ती वाढवताना या बाबीशी निगडित अन्य गोष्टींचा विचार अद्यापही केला गेला नाही. गृह कर्जमर्यादा वाढवली तरी सहकारी बँकेने एकूण गृह कर्जे किती वितरित करावीत याला मर्यादा आहे. बँकेच्या एकूण कर्जापैकी, व्यावसायिक बांधकाम क्षेत्राला दिलेली कर्जे १५ टक्यांपेक्षा अधिक नसणे अभिप्रेत आहे. सदर १५ टक्यांमध्येच १० टक्यांपर्यंतची उपमर्यादा गृह कर्जासाठी दिली आहे. ती अनावश्यक आहे. कारण घर खरेदीसाठी दिलेल्या कर्जाला बांधकाम व्यवसायाला दिलेले कर्ज म्हणणे अत्यंत चुकीचे आहे. कारण या कर्जाची परतफेड बांधकाम व्यावसायिक नाही तर गृह खरेदीदार स्वत:च्या उत्पन्नातून करत असतात. परंतु यावर रिझर्व्ह बँकेने अद्याप पुनर्विचार केलेला नाही. परिणामी, अनेक सहकारी बँकांची गृह कर्जमर्यादा संपुष्टात आल्यास आश्चर्य वाटणार नाही. रिझर्व्ह बँकेने गृह कर्ज परतफेडीची कालमर्यादा वाढविण्याबाबतही पुनर्विचार केलेला नाही. सहकारी बँकेकडून गृह कर्ज घेतल्यास परतफेडीची कमाल मुदत २० वर्षे असते. तर राष्ट्रीयीकृत अथवा खासगी बँका ३० ते ४० वर्षांपर्यंत परतफेडीचा कालावधी देतात. याचा विचार करून सहकारी बँकांनीही गृह कर्ज परतफेडीची मुदत किमान २५ ते ३० वर्षांपर्यंत देण्यास अनुमती द्यावी. त्याचबरोबर अग्रक्रम क्षेत्रासाठी गृह कर्जाची मर्यादा वाढविणे हादेखील मुद्दा अद्याप विचारात घेतलेला नाही. सहकारी बँकांकडे मुख्यत: गृह कर्ज प्रकरणांचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात असतो. उपरोक्त कारणांसाठी त्या गृह कर्ज देऊ शकल्या नाहीत, तर त्यांच्या जनमानसातील प्रतिमेवर काय परिणाम होईल याची कल्पनाच केलेली बरी. कर्ज वितरणातील अन्य बंधनामुळे या बँकांच्या व्यवसाय संधीवर मर्यादा येतील हे नि:संशय. या परिस्थितीवर मात करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने उपरोक्त दोन मुद्द्यांचा परामर्श घेऊन, सकारात्मक बदल करायला हरकत नसावी.सहकारी बँकेच्या संचालकांनी आठ वर्षांहून अधिक काळ संचालकपदी राहू नये हा बदल २०२० पासून अमलात आला. तो त्या दिवसापासून पुढील काळासाठी अभिप्रेत आहे. पण या कायद्याचा आधार घेऊन सहकारी बँकांच्या इन्स्पेक्शन रिपोर्टमध्ये सध्याच्या संचालक मंडळाबाबत याबाबत प्रश्न विचारून त्यांचे मानसिक खच्चीकरण करण्याचा पुरेपूर प्रयत्न रिझर्व्ह बँक करते आहे. दुसरा विषय आहे तो, सेट रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांना (एआरसी) विकलेल्या थकीत कर्जाच्या तरतुदींचा. ज्या थकीत कर्ज खात्यांमध्ये वसुली शक्य नाही, अशी थकीत कर्जे सेट रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांना विकण्याची अनुमती सहकारी बँकांना आहे. ती विकली जातात, त्या वेळी ती बँकेच्या पुस्तकातून निष्कासित होतात. अशी जी थकीत कर्ज खाती आता बँकेच्या पुस्तकातच नाहीत, त्याची तरतूद बँकांनी आता करावी अशा प्रकारचे परिपत्रक रिझर्व्ह बँकेने २४ सप्टेंबर २०२१ रोजी जारी केले. या परिपत्रकाबाबत अनेक बँकांनी, बँकांच्या संघटनांनी, या पुढील कालावधीत विकल्या जाणाऱ्या थकीत कर्जाबाबत हा नियम लागू करावा अशी विनंती केली. परंतु सहकारी बँकांनी, त्यांच्या संघटनांनी केलेली विनंती कितीही चांगली असली तरी, ती स्वीकारायची नाही अशी रझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांची मानसिकता आहे. त्यांनी या सूचनेकडे दुर्लक्ष तर केलेच, शिवाय २८ जून २०२२ रोजी परिपत्रक काढून आत्तापर्यंत सेट रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांना विकलेल्या थकीत कर्ज खात्यांपैकी आर्थिक वर्ष २०२१-२२ पासून २०२५-२६ पर्यंत दरवर्षी २० टयांप्रमाणे तरतूद करावी असे निर्देश दिले. बँकिंग नियमन कायदा कलम ३१ प्रमाणे आर्थिक विवरण पत्रके सादर करण्याची अंतिम तारीख ३० जून असताना केवळ दोन दिवस आधी हा तुघलकी निर्देश जारी करण्याचे धारिष्ट्य केवळ रिझर्व्ह बँकच करू जाणे. २८ जूनपूर्वी ज्या बँकांची हिशोबपत्रके लेखापरीक्षित झाली होती त्यांनी दाखवलेला नफा आरबीआयकडून सदर तरतुदीपोटी कमी करून गणला जात आहे. सहकारी बँकांच्या अंतर्गत तसेच वैधानिक लेखा परीक्षकांनी जी आर्थिक विवरण पत्रके, नफातोटा पत्रक, ताळेबंद तपासला होता, वार्षिक सर्वसाधारण सभेने ज्या हिशेब पत्रकांना मंजुरी दिली होती, ती हिशेब पत्रके बदलण्यास रिझर्व्ह बँकेने भाग पाडणे कितपत योग्य आहे? बँकिंग नियमन कायद्यात केलेल्या बदलांप्रमाणे, सहकारी बँकांना वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अनुमतीनेच करावी लागत आहे. रिझर्व्ह बँकेच्या तालिकेतील (एम्पॅनलमेंट) लेखापरीक्षकांचे दोन पर्याय निवडून, रिझर्व्ह बँकेकडे मंजुरीसाठी पाठवायच असतात. त्यातून एकाची मंजुरी रिझर्व्ह बँकेकडून मिळत असते. या लेखापरीक्षकांनी तपासलेली विवरणपत्रके, आर्थिक पत्रके योग्य आणि बरोबर असल्याचा निर्वाळा अहवालाच्या रूपाने सहकारी बँकांना प्राप्त होतो. लेखापरीक्षकांच्या या तपासणीलाही रिझर्व्ह बँकेकडून आव्हान दिले जाते, प्रसंगी त्यात आर्थिक पत्रके बदलाच्या सूचना दिल्या जातात. आपल्याच अनुमतीने निवडलेल्या लेखापरीक्षकांच्या कामकाजात ढवळाढवळ करण्याचे धारिष्ट्य रिझर्व्ह बँकच करू जाणे. सहकारी बँकांच्या व्यवस्थापनाचे नियंत्रण सहकारी खात्याकडे व आर्थिक बाबींचे रिझर्व्ह बँकेकडे अशी विभागणी आहे. परिणामी दुहेरी नियंत्रणाचा सामना सहकारी बँका करत आहेत. यातच रिझर्व्ह बँकेने बँकिंग नियमन कायद्यात बदल करून व्यवस्थापनाचे नियंत्रणही करण्याचा प्रयत्न केला आहे. सहकारी बँकांचे हे व असे अनेक प्रश्न आहेत. परंतु रिझर्व्ह बँकेला या प्रश्नांची सोडवणूक करण्याची खरोखर इच्छा आहे का? याबाबत आत्तापर्यंतचा अनुभव शून्य आहे, इतकेच.

# गणेश लांडगे यांची पीएसआय पदी निवड ही समाजासाठी भूषणावह बाब -अरविंद धिरडे

नगर (प्रतिनिधी)- गणेश जितेंद्र लांडगे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन चांगली कामगिरी केली आहे.ही समाजासाठी भूषणावह बाब आहे.अत्यंत मेहनतीने व जिद्दीने , परिश्रम घेऊन सुवर्ण अक्षरात नाव कोरले आहे.समाजाला वेळ देऊन सामाजिक काम करावे. तसेच जनतेला व सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस दलात कार्यरत राहावे.असे प्रतिपादन स्वकुळसाळी हित संवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख अरविंदराव धिरडे यांनी केले आहे.



गणेश जितेंद्र लांडगे यांनी २०२० ला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पोलीस उपनिरीक्षक परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी हित संवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख अरविंद धिरडे,संजय सागांवकर,पै.जितेंद्र लांडगे,अविनाश पावले,कृष्णा बागडे,उल्हास ढोरे,गजेंद्र सोनवणे,सौ.वनिता पाटेकर , श्रीमती छाया साळी,विक्रम पाठक,सचिन मडके,गणेश मानकर,चंद्रकांत मानकर,योगेश भागवत,संजय दळवी ,चंद्रकांत दळवी,बाबासाहेब वैद्य,दशरथ सुपेकर,जिव्हाळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनील पावले ,खजिनदार विठ्ठलराव पाठक, सदस्य सुभाष पाठक,सुरेश इंगळे ,संजय क्षीरसागर, सुधाकर धेंड,शक्ती गोहेर आदींसह समाज बांधव उपस्थित होते. कृष्णा बागडे म्हणाले, कोरोनाच्या काळात गणेश लांडगे यांनी अथक परिश्रम घेऊन पीएसआय पदाची परीक्षा उत्तीर्ण झाले. गणेश लांडगे यांनी जनतेला न्याय मिळवून देऊन पोलिसांविषयी आदर व कायद्याचा वचक निर्माण करावा. अविनाश पावले म्हणाले, आई-वडिलांच्या संस्कारामुळेच गणेश लांडगे यांनी ध्येय पूर्ण केले आहे.तसेच आई-वडिलांच्या व समाजाच्या नावलौकिकात भर घातली आहे.

विठ्ठल पाठक म्हणाले,गणेश लांडगे यांची निवड ही समाजासाठी प्रेरणादायी आहे. पोलीस दलात देशसेवेचे कार्य करावे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा बागडे यांनी केले.तर आभार गजेंद्र सोनवणे यांनी मानले.

# शिक्षणाच्या सुविधा असलेल्या भागात वसतिगृह व आश्रमशाळेसाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल - महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

शिर्डी (प्रतिनिधी)- शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध असलेल्या भागात आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी आश्रमशाळा आणि वसतिगृहाच्या एकत्रित प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. अशी ग्वाही महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे दिली .



एकात्मिक आदिवासी प्रकल्पा अंतर्गत हसनापूर येथे सुमारे १३ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या वसतिगृहाच्या इमारतीचा भूमीपूजन समारंभ मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी खासदार सदाशिव लोखंडे, प्रकल्प अधिकारी राजन पाटी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहाय्यक कार्यकारी अभियंता श्रीमती एस.बी.गाडेकर सरपंच सौ.छाया बारसे, प्रवरा बँकेचे संचालक किसनराव विखे,चेअरमन अशोकराव धावणे, आब्बास पटेल दादासाहेब घोगरे, सरपंच सौ.पूनम बर्डे, बाजार समितीचे संचालक राहूल धावणे ,उपसरपंच गणेश विखे अनिल विखे, वकील संघाचे अध्यक्ष नितीन विखे आदी उपस्थित होते.

महसूलमंत्री विखे पाटील म्हणाले की, यापूर्वी समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून मुला-मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे झालेले काम सर्वासाठी रोल मॉडेल ठरले आहे. या इमारतीचा मास्टर प्लॅन राज्यातील इतर वसतिगृहाच्या इमारतीसाठी उपयुक्त ठरला आहे. नव्याने विकसित होत असलेली इमारत सर्व सुविधांनी परिपूर्ण करण्याचा सूचनाही महसूलमंत्री श्री.विखे पाटील यांनी यावेळी दिल्या.

राज्य सरकारने आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांकरिता महत्त्वपूर्ण निर्णय करून त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. संशोधनात्मक शिक्षणासाठी शिष्यवृती योजना सुरू केली.उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी येत असल्याने वसतिगृहाच्या इमारती अद्यावत आणि सर्व सुविधांनी परीपूर्ण असाव्यात यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे महसूलमंत्र्यांनी यावेळी नमूद केले.

राज्यातील आदिवासी विभागात सुविधा उपलब्ध होत असल्याने या भागातील नागरिक विकासाच्या मुख्य प्रवाहात येत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून होत असलेल्या निर्णयाची माहिती समाजातील युवकांनी जाणून घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

खा.सदाशिव लोखंडे यांनी लोणी येथे मंत्री विखे पाटील यांच्या पुढाकाराने समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहाच्या कामाचे कौतुक करून आशा इमारती आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांकरीता उपयुक्त ठरतील असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी राजन पाटील यांनी केले.

# कोपरगाव सैनिकी मुलांच्या वसतिगृहात प्रवेशाचे आवाहन

शिर्डी (प्रतिनिधी)- कोपरगांव येथील सैनिक मुलांच्या वसतिगृहात २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. यासाठी २८ जूलै २०२३ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

इयत्ता अकरावी ते पदव्युत्तर शिक्षण तसेच औद्योगिक प्रशिक्षण आणि तांत्रिक विद्यालयामध्ये शिकत असणाऱ्या युध्द विधवा पाल्य, माजी सैनिक विधवा पाल्य, माजी सैनिक व युद्धात जखमी झालेले माजी सैनिकांचे पाल्य तसेच सेवारत सैनिक पाल्य यांना या वसतिगृहात प्रवेश देण्यात येणार आहे. प्रदर्शन रोडवरील खंडोबा मंदिराचे मागे कोपरगाव सैनिकी मुलांचे वसतिगृह कार्यरत आहे.

प्रवेश प्रक्रिया अर्ज २८ जूलै २०२३ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. ज्या पालकांनी अर्ज जमा केलेले आहेत. अशा पालकांनी व त्यांच्या पाल्याने ३१ जुलै २०२३ रोजी प्रवेश प्रक्रीयेसाठी स्वत: हजर राहणे आवश्यक आहे. युध्द विधवा व इतर माजी सैनिक विधवांचे सर्व पाल्यांना तसेच माजी सैनिक अनाथ पाल्यांना भोजन, निवास व सेवा शुल्क मोफत आहे.

प्रवेशअर्ज व अधिक माहितीसाठी वसतिगृह अधिक्षक ०२४२३/२२७२९० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन वसतिगृह अधीक्षक धन्यकुमार सरोदे यांनी केले आहे.

# काष्टी येथे धर्मांतरण प्रक्रियेसाठी आलेल्या ३ ख्रिश्चन महिलांची सखोल चौकशीची मागणी

नगर (प्रतिनिधी)- काष्टी येथे धर्मांतरण प्रक्रियेसाठी आलेल्या ३ ख्रिश्चन महिलांची सखोल चौकशीची करुन प्रतीक पाचपुते यांच्यावर ट्रॉसिटी चा खोटा गुन्हा दाखल केला आहे. तो तात्काळ मागे घेण्यात यावा अशी मागणी एकलव्य संघटना व महामाया बौद्ध धम्म संस्था यांचेवतीने जिल्हा पोलीस अधिक्षक यांना निवेदन देवून केली आहे.

शनिवार दि.१७/०६/२०२३ रोजी सकाळी १०.००वाजेच्या सुमारास दौंड जि. पुणे येथिल ३ ख्रिश्चन महिला मयुर प्रकाश मदरे, रा.काष्टी ता. श्रीगोंदा याचे रहाते घरात बळजबरीने घुसल्या त्या ३ ख्रिश्चन महिलांनी मयुर व त्याची आई सावित्री मदरे यांना तुम्ही ख्रिश्चन धर्मात प्रवेश करा म्हणजे तुमचे सर्व संकटे, अडचणी दुर होतील व तुमच्या मयुरचे लग्नही होईल असे सांगत दोघांच्याही कपाळास तेल लावले व येशु ख्रिस्ताची प्रार्थना म्हणयास सुरवात केली. यांनी विरोध केल्याने या महिलांनी येशु देवाची पार्थना केली नाही, तर तुमचे खुप वाईट होईल असे सुनावले.

या प्रकारची माहिती हिंदु सकल समाजाचे कार्यकर्ते प्रतीक पाचपुते यांना समजल्याने ते तात्काळ तेथे आले.त्यांनी या ख्रिश्चन महिलांना या प्रकाराचा जाब विचारला, त्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने पाचपुते यांनी काष्टी पोलीस स्टेशनला माहिती दिली. या महिलांना पोलीस स्टेशनला नेण्यात आले.मयुर मदरे यांचे तक्रारी वरुन या महिलांच्या विरोधात तक्रार नोदविण्यात आली.

मात्र रात्री खुप उशिराने रात्रीच्या १.१० वाजेच्या दरम्यान याच ख्रिश्चन महिलांच्या समर्थकांच्या दबावामुळे राजकीय हस्तक्षेपामुळे पोलीसांनी दबावाखाली येत प्रतिक पाचपुते या कार्यकर्त्यावर नाविलाजाने खोटा अ‍ॅट्रॉसीटी गुन्हा दाखल केला आहे.

खरे तर या तिनही महिला नम्रता व्यकंटेश वारनसे, शारदा आकाश सौंदडे,वैशाली सुनिल पवार तिघी राहाणार दौड जि. पुणे यांनीच बळजबरीने धर्मप्रसार प्रचाराचे निमीत्त करुन येथिल भोळया- भाबडया कुटूंबाना खोटे आमिष देण्याचे कृत्य केले आहे. मात्र हेच खिश्चन असुनही अ‍ॅट्रॉसीटीचा खोटा गुन्हा दाखल केलेला आहे.

तरी या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी व समाजासमोर खरा प्रकार उघडकीस यावा व या खिश्चन महिलांवर कायदेशिर कारवाई व्हावी.तसेच या अनुषंगाने त्यांच्यावर धर्मांतरण कायदयाअंतर्गत गुन्हे दाखल व्हावेत.या महिला बौध्द समाजातील असतांना त्या ख्रिश्चन धर्माचे पुर्णपणे पालन पुजापाठ करीत आहेत, त्यामुळे त्यांचे जातीचे दाखले व आरक्षण रदद करण्यात यावे.अशी मागणी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील व जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला व यांना भेटून महामाया बुद्ध धम्म संस्थेच्या अध्यक्षा संध्या खरे व एकलव्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष योगेश सूर्यवंशी, सकल हिंदू समाज अ'नगर जिल्ह्याचे विशाल वाकचौरे, दिपक रणशेवरे, सम्राट हासे, विकास शिंदे, दिपक बर्डे, सोमनाथ शिंदे आदींनी प्रत्यक्ष भेट घेतली.

# गुरु पौर्णिमा ही प्राचीन हिंदू संस्कृती- गजेंद्र सोनवणे

नगर (प्रतिनिधी)- गुरु पौर्णिमा ही प्राचीन हिंदू संस्कृती आहे.संतांच्या मार्गदर्शनामुळे प्रत्येकाच्या जीवनात आमुलाग्र बदल होतात. चांगले कर्म करणे, चांगले वागणे, चांगले बोलणे हे सर्व संस्कार समाजात रुजविण्याचे कार्य संत करीत असतात. महाभारत या महाकाव्याचे रचते महर्षी व्यास मुनी यांचा जन्मदिनी गुरु पौर्णिमा सर्वत्र साजरी केली जाते.सुखकर आयुष्य जगण्यासाठी गुरूंचे मार्गदर्शन आवश्यक आहे. वारकरी संप्रदायातील गुरूंचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असे आहेत.विश्व हिंदू परिषदेने गुरु पौर्णिमेनिमित्त नगर तालुक्यातील वारकरी संप्रदायातील संतांचा संपर्क करून गुरु पूजनाचा कार्यक्रम करण्यात आला.असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे यांनी केले आहे.

गुरुपौर्णिमेनिमित्त नगर जिल्हा विश्व हिंदू परिषदेच्या वतीने नगर तालुक्यातील शेंडी,जेऊर, डोंगरगण येथे जाऊन हभप श्री जंगले शास्त्री महाराज,हभप बाळकृष्ण महाराज केंद्रे ,हभप चांगदेव महाराज आठरे,हभप माधव महाराज कोरे यांचे गुरु पूजन करून आशीर्वाद घेतले. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे, जिल्हा सहमंत्री गौतम कराळे, श्रीकांत साठे, पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत प्रिंट मीडिया प्रमुख अमोल भांबरकर, भरत कदम,निलेश चिपाडे आदी उपस्थित होते.

# एमआयडीसी मधील अपहार झालेला शेंगदाण्याचा ट्रक मुददेमालासह हस्तगत

नगर (प्रतिनिधी)- एमआयडीसी मधील अपहार झालेला शेंगदाण्याची ट्रक मुददेमालासह हस्तगत करुन सराईत आरोपीच्या इनोव्हा कारसह ४१ लाख ३४ हजार रु किं. चा मुददेमाल हस्तगत करण्याची कामगिरी एमआयडीसी पोलीस स्टेशनने केली

दिनांक ०४/०७/२०२३ रोजी रात्री १२/४५ वा अहमदगर एमआयडीसी येथिल प्लॉट न ए १३ येथुन आयशर ट्रक क्रं एम एच १८ बी झेड ००५४ या ट्रक मध्ये शेंगदाणा भरलेल्या २०० गोण्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या ११,३४,०००/ रु किंमतीच्या सदर माल यातील ड्रायव्हर भारत इसके रा. कालुग्राम मोरीपुरा गंधवानी थार मध्यप्रदेश याच्या ताब्यात इंदोर येथे पोहचविण्याकरीता विश्वासाने वरील किंमतीचा माल सोपविण्यात आला होता परंतु सदर माल व ट्रक संबंधित ठिकाणी पोहचला नाही म्हणुन यातील फिर्यादी हरीष ट्रेंडिंग शेंगदाणा कंपनीचे मालक कृष्णा इंदाणी रा. कराचीवाला अहमदनगर तारकपुर एस टी स्टी स्टँड जवळ यांनी एम आय डी सी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरन गु.र. नंबर ५९८ / २०२३ भादवी कलम ४०६,४०७ प्रमाणे दि.०७/०७/२०२३ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.



तरी सदर गुन्हाचे गेले मालाचे व आरोपीचे तपास कामी एम आय डी सी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि राजेंद्र सानप यांनी पोलीस ठाण्याचे पोसई राजेंद्र गायकवाड, पोका / १०२४ नवनाथ दहिफळे, पोकॉ / २९४ प्रशांत धुमाळ अशाची तपास टिम बनवून मा. पोलीस अधिक्षक सो यांचे परवानणी ने सदर ची संभाजीनगर (औरंगाबाद) कडे रवाना केले. सदर टिमने संभाजीनगर येथे शेंद्रा येथे सदर गुन्हातील आयशर टेम्पो क्रं एम एच १८ बी झेड ००५४ हि बेवारस स्थितीत मिळुन आल्याने तिस पंचनामा करुन जप्त केले आहे. तसेच सदर ट्रकमधील शेंगदाणे गोण्या याचे तपास कामी जालना येथे जावुन सदर ड्रायव्हरने विकलेल्या शेंगदाणे गोण्या जालना येथील न्यू इंडीया शो रिपेअरिंग अॅन्ड बॉडी बिल्डरस या गॅरेज मधील नादुरुस्त आलेल्या ट्रकमध्ये लपवून ठेवलेल्या शेंगदाणे गोण्या एकुण ११,३४,०००/- रुपये किंमतीच्या गोण्या पंचनामा करुन हस्तगत केल्या. सदर गोण्या समीर मुन्ना शेख रा अंबड जि जालना यांने लपवुन ठेवलेलया असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर इसम नामे समीर मुन्ना शेख याचा शोध घेतला असता त्याचे ताब्यातील इनोव्हा गाडी क्रं एम एच ४३ एन ७३३६ या कार मध्ये पळून जातांना तपास पार्टी चे निर्दशनास आला असल्याने त्यांनी सदर बाबत अंबड पोलीस ठाण्यात कळवले असता सदरचा इसम अंबड येथे सदर कार सोडुन पळुन गेलेला आहे. सदर इनोव्हा कार मध्ये वरील चोरी गेलेल्या मालापेकी ०४ शेंगदाणा गोण्या मिळुन आल्या आहेत. समीर मुन्ना शेख जालना पोलीस स्टेशन गु.र.न. १५०/२०१८ भादवि कलम ४८९ (ए), (बी), (सी) ३४, आर्म याच्यावर यापूर्वी ता. अॅक्ट ३२५ बॉम्बे पोलीस अॅक्ट १३५ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत. अशा प्रकारे सदर टिमने अवघ्या ०२ दिवसांचे आत सदर गुन्हातील एकुण चोरी गेलेला शेंगदाण्याचा माल ११,३४,०००/- रुपये, किं. १५,००,०००/- किंमतीची आयशर ट्रक व २१५,००,०००/- रुपये या इनोव्हा कार असा एकुण ४१,३४,०००/- रुपये किमतीचा मुददेमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी राकेश ओला पोलीस अधीक्षक अहमदनगर, मप्रशांत खैरे सो. अपर पोलीस अीक्षक अहमदनगर मा. श्री. संपत भोसले सो. उपविभागीय पोलीस अधिकारी नगर ग्रामीण विभाग अहमदनगर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. राजेंद्र सानप, सो. पोसई गायकवाड सो, पोकॉनवनाथ दहिफळे, पोका २९४ प्रशांत धुमाळ व मोबाईल सेलचे पोशि नितीन शिंदे मपोशि ज्योती काळे, मपोशि रिंकी माढेकर यांचे पथकाने केलेली आहे.

## असे मिळवा जात वैधता प्रमाणपत्र
## जिल्ह्यात २६ जूलै पर्यंत विशेष मोहीम

अहमदनगर (प्रतिनिधी) :- राजर्षी शाहू महाराज जयंती पर्वानिमित्त जिल्हा जात पडताळणी समितीच्या वतीने २६ जूलै २०२३ पर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. इयत्ता ११ वी १२ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रे या मोहीमेत दिली जाणार आहेत.

मागासवर्गीय प्रवर्गातील कोणीही विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. जातवैधता प्रमाणपत्रासाठी महाविद्यालये मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे परिपूर्ण अर्ज घेतील आणि अहमदनगर जिल्हा जात पडताळणी समितीकडे पाठवतील. जात वैधता प्रमाणपत्रा विषयी विद्यार्थ्यांना सहज, सुलभ मार्गदर्शन करणारे एकदिवसीय शिबीरांचे ही आयोजन करण्यात येणार आहे.असे अहमदनगर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.


प्रमाणपत्रासाठी आवश्यक प्राथमिक कागदपत्रे

ऑनलाइन पद्धतीने भरलेल्या अर्जाची मूळ प्रत

अर्जदार विद्यार्थ्याचे जात प्रमाणपत्र

विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला

वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला


असे मिळवा जात वैधता प्रमाणपत्र
जिल्ह्यात २६ जूलै पर्यंत विशेष मोहीम

आजोबा/पंजोबा/खापर पंजोबा यांचा जात सिध्द करणारा पुरावा.

महाविद्यालयाचे शिफारस पत्र

शपथपत्र

बोनाफाईड दाखला

वरील कागदपत्रांच्या माध्यमातून मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जात सिध्द होत नसल्यास समिती अधिकचे पुरावे मागू शकते. त्यामुळे जात सिध्द करण्याकामी आवश्यक सर्व कागदपत्रे अर्जदाराने आधीच काढून ठेवणे आवश्यक आहे.

ऑनलाइन अर्ज कोठे भरावा

जात पडताळणी प्रमाणपत्र घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) https://bartievalidity.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज भरावा आणि या अर्जाची प्रिंट काढून घेणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी बार्टीच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

# ‘शासन आपल्या दारी’ अभियानांतर्गत’ जेजुरी येथे महारोजगार मेळाव्याचे आयोजन

पुणे (प्रतिनिधी)- ’शासन आपल्या दारी’ अभियानांतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे यांच्यामार्फत लाभार्थ्यांना थेट लाभ उपलब्ध करुन देण्याकरिता पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळाव्याचे १३ जुलै रोजी सकाळी १० वाजता जेजुरी पालखी तळ (ता. पुरंदर) येथे आयोजन करण्यात आले आहे.

या महारोजगार मेळावाद्वारे विविध पदांकरिता वेगवेगळ्या पात्रतेच्या उमेदवारांना नोकरीची विविध संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. बेरोजगार उमेदवारांसाठी नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने, त्यांच्यासह इतर सर्वच इच्छुक उमेदवारांनी रिक्तपदांच्या अधिक माहितीसाठी ु.ोिक्षसरी.ारहरीुरूरा. सेीं.ळप या संकेतस्थळावर जाऊन आपले पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने नोंदवावेत.

मुलाखतीस येताना उमेदवारांनी सोबत आपली सर्व शैक्षणिक कागदपत्रे, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, आवश्यकतेनुसार संक्षिप्त परिचयासह अर्ज व आधारकार्डच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात. खाजगी क्षेत्रातील या विविध रिक्तपदांच्या प्रत्यक्ष मुलाखतीसाठी जास्तीत जास्त नोकरीइच्छूक उमेदवारांनी १३ जुलै रोजी सकाळी १० वा. महारोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे प्र. सहाय्यक आयुक्त सा. बा. मोहिते यांनी केले आहे.



# उत्तर नगरच्या विकासाचा ध्यास !

महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण विकास हे ध्येय घेऊन राज्यात सत्तेवर आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला ३० जून २०२३ रोजी एक वर्ष पूर्ण झाले आहेत. या वर्षभराच्या कालावधीत महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार सदाशिवराव लोखंडे यांनी निळवंडे सारखे विविध प्रकल्प, योजना व विकासकामांना गती देत उत्तर अहमदनगर जिल्ह्याचा विकासाचा ध्यास घेतलेला दिसून येत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या पाठबळामुळे वर्षभरात विविध प्रकल्पांना मंजूरी मिळाली आहे. उत्तर नगर पर्यायाने शिर्डीच्या विकासाला चालना मिळाली आहे. या वर्षभराच्या कालावधीत झालेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांचा हा संक्षिप्त आढावा.

निळवंडेच्या डाव्या कालव्यातून पाणी - अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील निळवंडे (उर्ध्व प्रवरा प्रकल्प) धरण जिल्ह्यातील दुष्काळी व जिरायत भागाला सुजलाम् सुफलाम् करणारा प्रकल्प ठरणार आहे. डावा, उजवा, उच्चस्तरीय पाईप कालवा व उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून अकोले, संगमनेर, राहाता, श्रीरामपूर, कोपरगाव व सिन्नर (नाशिक) या तालुक्यातील १८२ गावांमधील ६८८७८ हेक्टर (१ लाख ७० हजार २०० एकर) शेतजमिन ओलिताखाली येणार आहे. सिन्नर तालुक्यातील ६ गावांमधील २६१२ हेक्टर शेतजमीन वगळता अहमदनगर जिल्ह्यातील ६६२६६ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येणार आहे. शासनाने ८ मार्च २०२३ रोजी ५१७७ कोटी रूपयांची पंचम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रकल्पास दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ३१ मे २०२३ रोजी निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्यातून पाणी सोडण्याची चाचणी यशस्वी झाली. शेतकऱ्यांनी हा आनंद फटाके फोडून, गुलाल उधळून साजरा केला. डाव्या कालव्यातून सोडण्यात आलेल्या पाण्याच्या ऐतिहासिक क्षणाचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘मन की बात’ कार्यक्रमात उल्लेख केला.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गामुळे विकासाला गती - समृध्दी महामार्गाचा नागपूर ते शिर्डी असा ५२० किलोमीटरच्या या पहिल्या टप्प्यातील वाहतूक-दळणवळण सेवेचे ११ डिसेंबर २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर येथून लोकार्पण झाले आणि महामार्ग वाहतूकीसाठी सर्वसामान्यांना खुला झाला. शिर्डी ते भरवीर (इगतपुरी) पर्यंत ८० किलो मीटरच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण २६ मे २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थित कोकमठाण (ता.कोपरगांव) येथे झाले. समृध्दीच्या एकूण ७०१ कि.मी पैकी आता एकूण ६०० कि.मी लांबीचा समृद्धी महामार्ग वाहतुकीस खुला झाला आहे. समृध्दी महामार्गापासून शिर्डीचे अंतर १० किलोमीटर आहे.यामुळे उत्तर अहमदनगर जिल्ह्यातील तालुक्यांच्या कृषी, उद्योग व व्यवसायाला चालना मिळून या परिसराच्या विकासाला बूस्ट मिळणार आहे.

शिर्डी विमानतळ नवीन टर्मिनल इमारत - कोपरगाव तालुक्यातील काकडी येथे असलेल्या शिर्डी विमानतळावर नविन प्रवाशी टर्मीनल इमारत उभारली जाणार असून यात तासाला सुमारे १२०० प्रवाशी हाताळण्याची क्षमता त्यात असणार आहे. सुमारे ५५ हजार चौरस मिटर क्षेत्रफळावर हे काम होणार आहे. ५२७ कोटी रुपयाची या कामाची निवीदा नुकतीच प्रसिध्द करण्यात आली असून दोन वर्षात हे काम पूर्ण करण्याचा मानस महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाचा आहे.

नाईट लँडिंग चाचणी यशस्वी - शिर्डी विमानतळावर ८ एप्रिल २०२३ रोजी नाईट लॅडिंगची चाचणी यशस्वी झाली आहे. दिल्लीहून निघालेले पहिले प्रवासी विमान २११ प्रवासी घेऊन दाखल झाले. नाईट लॅडिंग सुविधेमुळे भविष्यात शिर्डी विमानतळाच्या विकासाला आणि परिसराच्या अर्थकारणाला मोठी गती येणार आहे.

शिर्डी सौंदर्यकरणांचा ५२ कोटींचा आराखडा - शिर्डी शहर, मंदीर परिसर, परिक्रमा मार्गाचे सुशोभीकरण करून ठिकठिकाणी सौंदर्यस्थळे विकसित व्हावीत यासाठी राज्यशासनाकडून शिर्डीसाठी ५२ कोटींचा विशेष निधी मंजूर झाला आहे. या निधीच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात मंदीरासमोरील पादचारी मार्ग, शहरातील मुख्य प्रवेश मार्ग, मुख्य चौक, मंदीर आवारातील पादचारी मार्ग, शिर्डी परिक्रमेचा १४ किलोमीटरचा मार्गाच्या सौंदर्यीकरणाचे सुनियोजन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यातील कामांना तीन महिन्यात सुरूवात होईल.

=उत्तर नगरसाठी शिर्डी येथे स्वतंत्र अपर जिल्हाधिकारी कार्यालय - शासनाने शिर्डी (ता.राहाता) येथे ५ जुलै २०२३ शासन निर्णयानुसार स्वतंत्र अपर जिल्हाधिकारी कार्यालयास मंजूरी मिळाली आहे. त्यासाठी अपर जिल्हाधिकारी, नायब तहसिलदार, लघु टंकलेखक, अव्वल कारकून व महसूल सहाय्यक पदांची निर्मिती केली आहे. त्यात कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, संगमनेर, अकोले, राहूरी या तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे उत्तर अहमदनगर मधील नागरिकांची पायपीट वाचणार आहे.

महापशुधन एक्स्पो - शिर्डी येथे २४ ते १६ मार्च २०२३ रोजी देशपातळीवर सर्वात मोठे ‘महापशुधन एक्स्पो २०२३’ या प्रदर्शनाचे राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने यशस्वीपणे आयोजन करण्यात आले. या ‘महापशुधन एक्स्पोत’ सर्वसामान्य शेतकरी, पशुपालक, नागरिक, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. यामुळे शिर्डीचे नावलौकीक देशपातळीवर पोहचले.

महसूल प्रशासन जलद - लोणी येथे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व महसूलमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत २२ व २३ फेब्रुवारी २०२३ लोणी येथे राज्यस्तरीय महसूल परिषद रोजी घेण्यात आली. या महसूल परिषदेच्या माध्यमातून राज्यासाठी सर्वसमावेशक वाळू धोरणाची आखणी करण्यात आली. मुख्यमंत्री कृषी सौर वाहीनी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. ही या परिषदेची फलनिष्पती म्हणता येईल.

सावळीविहिर येथे पशुवैद्यकीय महाविद्यालय व देशातील पहिले पशु विज्ञान केंद्र - पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नाने शासनाने सावळीविहिर येथे पशुवैद्यकीय महाविद्यालयास मंजूरी दिली आहे. या पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी कृषी विज्ञान केंद्राच्या ७५ एकर जागेची १३ एप्रिल २०२३ रोजी मान्यता देण्यात आली आहे. या पशुवैद्यकीय महाविद्यालयाचा अहमदनगर जिल्ह्याप्रमाणे उत्तर महाराष्ट्रातील पशुपालकांना लाभ होणार आहे. कृषी विज्ञान केंद्राच्या धर्तीवर देशातील पहिले पशु विज्ञान केंद्र स्थापन करण्याचा निर्णय ही घेण्यात आला आहे.

लॉजिस्टीक पॉर्क व थीम पॉर्क - शिर्डीत शेती महामंडळांच्या जागेवर लॉजिस्टीक पॉर्क उभारण्याची घोषणा महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे. यासाठीचा आराखडा तयार करण्याच्या सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. शेती महामंडळाच्या जागेवरच श्री साईबाबांच्या जीवन चरित्रावर आधारित थीम पॉर्क उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिर्डीत झालेल्या महापशुधन मेळाव्यात केली आहे. यासाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून निधी दिला जाणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली आहे.

राज्यातील पहिला शासकीय वाळू डेपो - श्रीरामपूर तालुक्यातील नायगांव येथे राज्यातील पहिल्या शासकीय वाळू डेपोचे लोकार्पण महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याहस्ते १ मे २०२३ रोजी करण्यात आले. यानंतर पुणतांबा, आश्वी (संगमनेर) येथे शासकीय वाळू केंद्र सुरू झाले. या वाळू केंद्रातून सर्वसामान्यांना वाहतूक खर्च वगळता ६०० रूपयात एक ब्रास वाळू मिळत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे. शासनाचा हा क्रांतिकारी निर्णय ठरला आहे.

संकलन - सुरेश पाटील, माहिती अधिकारी, उप माहिती कार्यालय, शिर्डी.

# औंध आयटीआय येथे ३३ व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु

पुणे (प्रतिनिधी)– औंध येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत एक ते दोन वर्ष मुदतीच्या ३३ व्यवसाय अभ्यासक्रमांमध्ये १ हजार ६६४ प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली असून ११ जुलैपर्यंत प्रवेश अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक अर्हता १० वी उत्तीर्ण/ अनुत्तीर्ण अशी आहे. प्रशिक्षणार्थ्यांना प्रतिवर्षी साधारणपणे दोन हजार रुपये खर्च येणार आहे.

एक वर्ष मुदतीचे व्यवसाय अभ्यासक्रम: कारपेंटर (वुड वर्क टेक्निशियन), फोटोग्राफर, सुईंग टेक्नोलॉजी, सेक्रेटरियल प्रॅक्टीस (इंग्रजी), मेकॅनिक डिझेल, स्टेनोग्राफर सेक्रेटरियल असिस्टंट (इंग्रजी), शिट मेटल वर्कर, प्लंबर, वेल्डर, मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रिकल ण्ड इलेक्ट्रॉनिक्स, म ेसन, कॉम्पुटर ऑपरेटर ण्ड प्रोग्रॅमिंग असिस्टंट, डेस्कटॉप पब्लिशिंग ऑपरेटर आणि प्लॉस्टिक प्रोसेसिंग ऑपरेटर.

दोन वर्ष मुदतीचे व्यवसाय अभ्यासक्रम: मशिनिस्ट, फीटर, मशिनिस्ट ग्राईंडर, मेकॅनिक मोटर व्हेईकल, मेकॅनिक मशिन टुल मेन्टेनन्स, टर्नर, टूल ण्ड डायमेकर (डाईज ण्ड मोल्ड), टूल ण्ड डायमेकर (प्रेस टुल्स, जिग्ज आणि फिक्चर), ड्राफ्टसमन मेकॅनिकल, ड्राफ्टसमन सिव्हिल, इलेक्ट्रोप्लेटर, सर्व्हेअर, पेंटर (जनरल), इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, इन्स्ट्रुमेंट मेकॅनिक, इलेक्ट्रिशियन, एरोनॉटिकल स्ट्रक्चर ण्ड इक्विपमेंट फिटर, वायरमन आणि रेफ्रिजरेशन ण्ड एअर कंडीशनर टेक्निशियन.

प्रत्येक व्यवसाय अभ्यासक्रमांमध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. ११ जुलै पर्यंत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची व १२ जुलै पर्यंत निश्चित करुन विकल्प भरण्याची संस्थेमध्ये सुविधा आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला जास्तीत जास्त शंभर विकल्प भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरलेले आहेत परंतु निश्चित करुन विकल्प भरलेले नाहीत त्यांनी विहित मुदतीत संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहून आपल्या पसंतीक्रमानुसार विकल्प भरावेत.

औंध येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत चालू वर्षापासून एरोनॉटीकल स्ट्रक्चर ॲण्ड इक्विपमेंट फिटर हा दोन वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यात आलेला आहे. हा व्यवसाय पुर्ण केल्यानंतर विमान कंपनीमध्ये तसेच वाहन उद्योगामध्ये रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. डेसॉल्ट एव्हिएशन या फ्रेंच कंपनीने नागपुर येथे नवीन शाखा स्थापन केलेली आहे. ही कंपनी आय. टी. आय. औंध, पुणे करीता तांत्रिक सहकार्य उपलब्ध करुन देणार आहेत.

स्टेनो (मराठी) हा व्यवसाय अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, खेरवाडी, वांद्रे. मुंबई– ५ यांच्यामार्फत राबविण्याचे प्रस्तावित असून ऑफलाईन प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

प्रवेशासाठी संस्थेत प्रत्यक्ष भेट देवून किंवा संस्थेच्या भ्रमणध्वनी हेल्पलाईन क्रमांक ८८५७९८४८२२ वर मार्गदर्शन घ्यावे. http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळाला भेट देवून प्रवेश प्रक्रिया निश्चित करता येईल, असे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपसंचालक आर. बी. भावसार यांनी कळविले आहे.

## बजरंग दल हे देशातील तरुणांचे मोठे संघटन- प्रदिप उगले



नगर (प्रतिनिधी)–बजरंग दल हे देशातील तरुणांचे मोठे संघटन आहे. सेवा,सुरक्षा आणि संस्कार या सूत्रीप्रमाणे विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे कार्य सुरू आहे. लव जिहाद, गोरक्षण,धम ंतिरण, जिहादी प्रवृत्ती आदी समस्यांना तोंड देण्यासाठी बजरंग दल सक्षम आहे.भातकुडगाव येथील कार्यकर्त्यांनी बजरंग दलाच्या शाखेचे उद्घाटन केले आहे.येत्या वर्षात शेवगावात बजरंग दलाच्या शंभर शाखा उघडण्यात येतील. असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे प्रांत सेवा विभागाचे सह प्रमुख डॉ.प्रदिप उगले यांनी केले आहे. शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव येथे विश्व हिंदू परिषद बजरंग दलाच्या शाखेचे उद्घाटन पार पडले.याप्रसंगी विश्व हिंदू परिषद प्रांत सेवा विभागाचे सह प्रमुख डॉ.प्रदिप उगले,विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे,जिल्हा सहमंत्री मुकुल गंधे,बजरंग दलाचे शहर संयोजक कुणाल भंडारी,रा.स्व.संघाचे जगदीश धूत,बंडु रासने,प्रखंड मंत्री मुकुंद गाडेकर,केशव भुजबळ,सरपंच विठ्ठल फटांगरे,ह.भ.प शिवशाहीर कल्याण महाराज काळे,अमोल नजन,ज्ञानेश्वर सानप,अक्षय देवरे,राहुल रोकडे,ऋषिकेश भेंडेकर,निलेश भेंडेकर,शिवम काळे आदी उपस्थित होते.

## दामिनी पथक सक्षम करण्यासाठी सहकार्य करणार- पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील




पुणे (प्रतिनिधी)– पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयात कार्यरत असलेले दामिनी पथक सक्षम करण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयात आयोजित जिल्हा नियोजन निधीतून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या ५ स्कॉर्पिओ आणि १२ बोलेरो वाहनांच्या लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, आमदार महेश लांडगे, दिलीप मोहिते, उमा खापरे, पोलिस आयुक्त विनय कुमार चोबे, सह पोलिस आयुक्त डॉ. संजय शिंदे, अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले, महिलांच्या सुरक्षेसाठी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीत दामिनी पथकांची संख्या वाढवावी. त्यासाठी वाहने कमी पडू देणार नाही. सायबर क्राईम लॅबची संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत. पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयातील दिशा उपक्रमात सहभागी ७ अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन त्यांच्या सहभाग वाढवावा. ज्येष्ठ नागरिक कक्षाद्वारे ज्येष्ठांच्या समस्या वेळेत सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत.

नवीन वाहनांच्या सम ायोजनामुळे पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तलयातील बरासचा वाहतुकीचा प्रश्न मि टण्यास मदत होणार असून गस्त घालण्यासाठी वाहनांची मदत होईल. पोलिसांच्या वसाहती, रिक्त पदे, जलद प्रतिसाद पथक, प्रलंबित प्रस्ताव व इतर म ागण्या आणि समस्या याविषयी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन प्रश्न निकाली काढले जातील, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

यावेळी पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.







जागृत शोध हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर यांनी शिवकृपा प्रिंटर्स माळीवाडा अहमदनगर येथे छापुन, नगर– कल्याण रोड भावनाऋषी अहमदनगर ४१४००१ येथे प्रकाशित केले. संपादक– भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर मो. नं. ८००७०७२८२८, कार्यालय–कुंभार आळी, शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे ४१२२१० jagrutshodha@gmail.com